आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३० जानेवारी २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करणार

- येत्या काही महिन्यात देशाची स्वतःची एआय प्रणाली विकसित होईल, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून विश्वास व्यक्त

- आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात जाणारे शुभांशु शुक्ला पहिले भारतीय ठरणार

**आणि**

- विमान आणि हेलिकॉप्टरची टक्कर होऊन झालेल्या दुर्घटनेत अमेरिकेत ३० जणांचा मृत्यू

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं सुरुवात होईल. दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला त्या संबोधित करतील. त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण अहवाल मांडला जाईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या शनिवारी अर्थसंकल्प सादर करणार आहेत. सोमवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर दोन्ही सभागृहात चर्चा होईल. त्यानंतर अर्थसंकल्पावर १३ फेब्रुवारीपर्यंत

चर्चा होईल. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र १० मार्चपासून सुरू होईल. या अधिवेशनात १६ विधेयक मांडण्याचं सरकारचं नियोजन आहे.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. बैठकीला ३६ विविध पक्षांचे मिळून ५२ खासदार उपस्थित होते असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामकाज सुरळीतपणे चालवण्याच्या दृष्टीने सहकार्याचं आवाहन यावेळी सरकारतर्फे करण्यात आलं.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, तसंच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश, गौरव गोगोई, तृणमूलचे सुदीप बंदोपाध्याय, समाजवादी पार्टीचे रामगोपाल यादव, बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा आणि द्रमुकचे टी आर बालू यांच्यासह विविध पक्षांचे खासदार त्यात सहभागी झाले होते.

या अधिवेशनात बेरोजगारी, महागाई हे मुद्दे उपस्थित करणार असल्याचं काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी म्हणाले. प्रयागराजमध्ये झालेल्या दुर्घटनेवरही त्यांनी काळजी व्यक्त केली. वक्फ सुधारणा विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल घाईघाईत मंजूर झाल्याचा आरोप त्यांनी केला. हा अहवाल समितीचा नसून पक्षाला असल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे खासदार राम गोपाल यादव यांनी केला.

**<><><><><>**

भारत येत्या काही महिन्यात स्वतःची एआय प्रणाली विकसित करेल. जगातल्या सर्वोत्तम AI प्रणालीच्या तोडीची ही प्रणाली असेल, असा विश्वास इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज व्यक्त केला. डीपसीक हे एआय तंत्रज्ञान लवकरच भारतात येईल, असंही ते यावेळी म्हणाले. या सर्व तंत्रज्ञानाच्या सुरक्षेसाठी संस्थाही स्थापन केली जाईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी तसंच देशासाठी बलिदान करणाऱ्या हुतात्म्यांना आज देश आदरांजली वाहत आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत  गांधी स्मृती इथे आज संध्याकाळच्या  सर्वधर्मीय प्रार्थनासभेत भाग घेतला.

नवी दिल्लीत राजघाट या गांधीजींच्या समाधीस्थळी सकाळी सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन केलं होतं. त्यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गांधीजींच्या समाधीवर पुष्पचक्र वाहून अभिवादन केलं.  उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनीही समाधीस्थळावर पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.  तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख तसंच संरक्षणदल प्रमुखही यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत पैसे वाटप झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर निवडणूक आयोगाचं पथक आज पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या दिल्लीतल्या निवासस्थानी दाखल झालं. निवडणूक आयोगाला सी व्हिजील ॲपवर तक्रार मिळाली होती, त्यामुळे चौकशी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी आल्याचं आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितलं. या प्रकरणी कोणत्याही कारवाईचे आदेश दिलेले नसून तपास यंत्रणांच्या कामात आयोग हस्तक्षेप करणार नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

हरियाणा सरकारने यमुना नदीत जाणीवपूर्वक विषारी पदार्थ प्रवाहित केल्याच्या आरोपासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाने आम आदमी पक्षाचे समन्वयक अरविंद केजरीवाल यांच्याकडे स्पष्टीकरण मागितल्याच्या कार्यवाहीवर केजरीवाल यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. आपण यमुना नदीतल्या अमोनियायुक्त पाण्याच्या तीन बाटल्या निवडणूक आयोगाला पाठवल्याचंही केजरीवाल यांनी माध्यमांना सांगितलं.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचे ज्य़ेष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रोहिणी आणि वझिरपूर भागात प्रचारसभांना संबोधित केलं. दिल्लीतल्या आप सरकारने मागच्या दहा वर्षात फक्त गोंधळ घातला अशी टीका भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी कृष्णनगर इथल्या प्रचारसभेत केली.

आपचा पराभव करण्यासाठी काँग्रेस भाजपासोबत मिळून काम करत आहे, असा आरोप अरविंद केजरीवाल यांनी केला. काँग्रेस कार्यकर्त्यांनी काँग्रेसला मतदान करू नये, असं आवाहनही त्यांनी केलं.

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी अमृतपुरी इथल्या प्रचारसभेला संबोधित केलं. आम आदमी पार्टीने दिलेली सर्व आश्वासनं पूर्ण केली असं मान म्हणाले.

**<><><><><>**

प्रयागराज महाकुंभ इथं असलेल्या संगम घाटाला आज उत्तरप्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार आणि पोलिस महासंचालक प्रशांत कुमार यांनी आज भेट दिली. काल चेंगराचेंगरी झालेल्या दुर्घटना स्थळाला त्यांंनी भेट दिली. जखमींवर उपचार सुरु आहेत त्या स्वरुपरानी नेहरु रुग्णालयालाही त्यांनी भेट दिली. संगमाजवळ आखाडा मार्गावर काल झालेल्या चेंगराचेगरीत तीसजण ठार झाले होते. या दुर्घटनेच्या चौकशीसाठी उत्तरप्रदेश सरकारने तीनजणांची न्यायिक समिती गठीत केली आहे. या समितीचे सदस्यही उद्या महाकुंभमेळ्याच्या स्थळाला भेट देतील.

**<><><><><>**

शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात जाणारे पहिले भारतीय ठरणार आहेत. ते भारतीय हवाई दलाचे अधिकारी अधिकारी असून इस्रोनं गगनयान मिशनसाठीही त्यांची निवड झाली आहे.

जूनमध्ये नासाच्या केनेडी स्पेस सेंटर इथून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणाऱ्या यानाचे ते पायलट असतील. या मोहिमेचं नेतृत्व पेगी

व्हिट्सन करणार आहेत. अंतराळ स्थानकावर उतरल्यानंतर हे अंतराळवीर १४ दिवस राहतील. अंतराळ संशोधनाविषयीचा प्रचार प्रसार, त्याची व्यावसायिक उपयोगिता हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत, विमान आणि हेलिकॉप्टरची टक्कर होऊन झालेल्या दुर्घटनेत किमान २८ जणांचा मृत्यू झाला आहे. अमेरिकन एअरलाइन्सचं हे विमान रोनाल्ड रीगन राष्ट्रीय विमानतळाकडे  येत असताना हवेतच त्याची हेलिकॉप्टरशी टक्कर झाली. या विमानात 60 प्रवासी आणि चार कर्मचारी, तर हेलिकॉप्टरमध्ये तीन सैनिक होते. शोधकार्य सुरु असून वॉशिंग्टन डीसीतल्या पोटोमॅक नदीतून किमान २८ मृतदेह हाती लागले आहेत. इतरांचा शोध घेण्यासाठी 300 कर्मचारी काम करत आहेत.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत सुरु झालेल्या मेघालयाविरुद्धच्या सामन्यावर मुंबईनं पहिल्याच दिवशी मजबूत पकड घेतली आहे. मुंबईनं नाणेफेक जिंकून मेघालयाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं, आणि ८६ धावात त्यांचा पहिला डाव गुंडाळला. शार्दुल ठाकुरनं ४, मोहित अवस्थीनं ३, सिल्वेस्टर डिसुझानं २, तर शम्स मुलाणीनं १ गडी बाद केला.

त्यानंतर, मुंबईनं पहिल्या डावात दिवसअखेर २ बाद २१३ धावा करत १२७ धावांची आघाडी घेतली. आजचा खेळ थांबला तेव्हा सिद्धेश लाड ८९, तर कर्णधार अजिंक्य राहणे ८३ धावांवर खेळत होता.

सोलापूर इथं महाराष्ट्र आणि त्रिपुरा यांच्यातला सामना आज सुरु झाला. त्रिपुरानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि दिवसअखेर ५ बाद २३० धावा केल्या. आजचा खेळ थांबला तेव्हा श्रीनिवास शरत् ६६,  तर रजत डे १८ धावांवर खेळत होता. महाराष्ट्रातर्फे हितेश वाळूंजनं ३ गडी बाद केले.

**<><><><><>**

बँकॉक इथं सुरू असलेल्या थायलंड मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदम्बी श्रीकांत आणि शंकर सुब्रमणियन यांनी पुरुष एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पदकतालिकेत २३ पदकांसह महाराष्ट्राने तिसरा क्रमांक पटकावला आहे. महाराष्ट्राच्या खात्यात ४ सुवर्ण, ११ रौप्य आणि ८ कांस्य पदकांचा समावेश आहे.

या स्पर्धेत ट्रायथलॉन प्रकारात महाराष्ट्राने सहा पदकांची कमाई केली आहे. वैयक्तिक ट्रायथलॉन, मिश्र रिले आणि डुएथलॉन अशा तिन्ही प्रकारात महाराष्ट्राने २ सुवर्ण, २ रौप्य आणि २ कांस्य पदकांची कमाई केली आहे. पार्थ मिरगे, डॉली पाटील, मानसी मोहिते या खेळाडूंनी पदकांची कमाई करत महाराष्ट्राच्या पदकांच्या कमाईत भर टाकली आहे. महिलांच्या ४०० मीटर पोहण्याच्या स्पर्धेत मेडले प्रकारात महाराष्ट्राच्या सानवी देशवाल हिने सुवर्णपदक पटकावलं आहे.

या स्पर्धांमध्ये पंधराशे मीटर पोहण्याच्या स्पर्धेत फ्रीस्टाईल प्रकारात दिल्लीच्या कुशाग्र रावत याने १५ मिनिटं, ३७ सेकंद आणि ७९ मिनिसेकंद इतकी वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावलं आहे. कुशाग्रने नोंदवलेली वेळ हा पुरुषांच्या फ्रीस्टाईल प्रकारातला राष्ट्रीय विक्रम ठरली आहे.

**<><><><><>**

गेल्या वर्षभरात भारतीय तटरक्षक दलानं विविध कारवायांअंतर्गत एकंदर ३७ हजार २१७ कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत.

**//<><><><><>//**